# दत्ताचा पाळणा

जो जो जो जो रे सुकुमारा । दत्तात्रया अवतारा ॥ ध्रु० ॥

कमलासन विष्णु त्रिपुरारी । अत्रिमुनीचे घरीं ।
सत्त्व हरूं आले नवलपरी । भ्रम दवडीला दुरी ॥ जो० ॥

प्रसन्न त्रिमूर्ति होऊनी । पुत्रत्वा पावुनी ।
हर्ष झालासे त्रिभुवनीं । राहे ऋषिचे सदनीं ॥ जो० ॥

पालख बांधविला सायासीं । निर्गुण ऋषिचे वंशीं ।
पुत्र जन्मला अविनाशी । अनसूयेचे कुशीं ॥ जो० ॥

षट्दश नामासी आधार । दत्तात्रय अवतार ।
कृष्णदासासी सुख थोर । आनंद होतो फार ॥ जो० ॥